अमरावती महानगरपालिका अमरावती

स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि./1091/2026 दिनांक :- 28 / 10 /2026

कोटेशन मागविण्याबाबत सूचना

विषय :- साथ रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १० नग हॅन्ड फॉगिंग मशीन खरेदी करण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रके मागविणेबाबत.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये साथ रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डास प्रतिबंधक उपाययोजना तसेच कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने धूर फवारणीचे काम प्रभावीपणे राबविण्याकरिता स्वच्छता विभागास १० नग हॅन्ड फॉगिंग मशीन खरेदी करावयाच्या आहेत.

त्याअनुषंगाने सदर साहित्याचा पुरवठा करण्यास इच्छुक असलेल्या अधिकृत उत्पादक, विक्रेते व पुरवठादार यांच्याकडून खालील तपशिलानुसार सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

खरेदी करण्यात येणाऱ्या साहित्याचा तपशील:-

अ.क्र.	साहित्याचे नाव	नग	दर प्रतिनग
1	हॅन्ड फॉगिंग मशीन (Hand Fogging Machine)	१ नग	

दरपत्रक सादर करण्याच्या अटी व शर्ती :-

१. दरपत्रक सादर करणारी संस्था अधिकृत उत्पादक, विक्रेता अथवा पुरवठादार असणे आवश्यक राहील.

२. दरपत्रकामध्ये हॅन्ड फॉगिंग मशीनचे कंपनीचे नाव, मॉडेल क्रमांक, तांत्रिक वैशिष्ट्ये, क्षमता व इतर आवश्यक माहिती स्पष्टपणे नमूद करावी.

३. दरपत्रकामध्ये प्रति नग दर, १० नगांची एकूण किंमत, जीएसटी, वाहतूक खर्च व इतर अनुषंगिक खर्च स्वतंत्रपणे नमूद करावेत.

४. पुरवठा करण्यात येणाऱ्या सर्व मशीन नवीन, चांगल्या दर्जाच्या, कार्यक्षम व दोषविरहित असणे आवश्यक राहील.

५. मशीनसोबत आवश्यक तांत्रिक माहितीपत्रक (Technical Brochure), वापर पुस्तिका व हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. पुरवठा करण्यात येणाऱ्या मशीनवर किमान १ वर्षाची हमी देणे आवश्यक राहील.

७. पुरवठादाराने जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व आवश्यक व्यवसाय नोंदणी कागदपत्रांच्या प्रती दरपत्रकासोबत जोडाव्यात.

८. संबंधित पुरवठादाराने महानगरपालिकेकडून पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर विहित मुदतीत संपूर्ण साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

९. पुरवठा करण्यात आलेल्या मशीनची प्रत्यक्ष तपासणी व कार्यक्षमता चाचणी समाधानकारक झाल्यानंतरच देयक अदा करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१०. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर किमान ९० दिवसांपर्यंत वैध राहतील.

११. दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे, तसेच दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी, अमरावती महानगरपालिका यांच्याकडे राखीव राहतील.

१२. सदर खरेदी प्रक्रिया महानगरपालिकेच्या लागू असलेल्या खरेदी नियम व शासन निर्देशांच्या अधीन राहील.

Scanned with OKEN Scanner

इच्छुक पुरवठादारांनी आपली सीलबंद दरपत्रके दिनांक ०३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वच्छता विभाग, अमरावती महानगरपालिका, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करावीत. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

वैद्यकिय अधिकारी (स्वच्छता)
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner